म. बसवेश्वर व म. गांधी यांच्या राजकीय आणि सामाजिक चिंतनाचे तुलनात्मक अध्ययन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील 'राज्यशास्त्र' विषयाच्या
विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या

संशोधनाचा आराखडा

●

संशोधक
प्रा. शंकरय्या करबसय्या कळ्ळीमठ
एम.ए., एम.फिल.
साहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगर,
कोटग्याळ, ता. मुखेड, जि. नांदेड

●

मार्गदर्शक
डॉ. अजय वसंतराव गव्हाणे
एम.ए., एम.फिल., पीएच.डी.
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
यशवंत महाविद्यालय, नांदेड

मार्च २०१६

म. बसवेश्वर व म. गांधी यांच्या राजकीय आणि सामाजिक चिंतनाचे तुलनात्मक अध्ययन

विषयप्रवेश (Introduction)

भारत भूमी संतांची व महापुरुषांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, वर्धमान महावीर, तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, संत कबीर, गुरूनानक, संत रामदास स्वामी, स्वामी दयानंद सरस्वती, संत गाडगे महाराज, महात्मा गांधी यांसारख्या अनेक संत, महात्म्यांचा व महापुरुषांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. या सर्व संत, महापुरुष व धर्मसंस्थापकांनी आपले आध्यात्मिक स्थान कायम ठेवून आपल्या वैचारिक प्रबोधनातून समाजात अनेक प्रकारच्या सुधारणा घडवून आणल्या. यातील काही संतांनी सामाजिक व धार्मिक प्रबोधनाबरोबरच तत्कालीन राजकीय व्यवस्थेवर भाष्य करून राजकीय सुधारणाही सुचविल्या. त्यात म. बसवेश्वर व म. गांधी यांचा उल्लेख करावा लागेल. या दोघांनी राजकारणाला एक नवा तत्त्वसिद्धांत प्रदान केला.

म. बसवेश्वर हे बाराव्या शतकातील बिज्जळ साम्राज्याच्या दरबारात महामंत्री पदावर कार्यरत राहून समाजाची सेवा केली. त्यांनी 'वीरशैव लिंगायत धर्माचे संस्थापक' या दृष्टीने केलेल्या कार्याला इतिहासात तोड नाही. म. बसवेश्वरांच्या कारकिर्दीमुळेच आज कर्नाटकाला 'शरणांची पवित्र भूमी' म्हणून ओळखले जाते. बाराव्या शतकात म. बसवेश्वरांनी वचन साहित्य निर्माण करून अनेक वचनकारांचे नेतृत्व केले होते. ते एक श्रेष्ठ द्रष्टे व समाजसुधारक होते. त्यांनी केलेल्या सामाजिक, धार्मिक व राजकीय सुधारणा अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्या काळात त्यांनी समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. जातीयता नष्ट करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली. त्या काळात आंतरजातीय विवाह घडवून आणणारे जगातील ते प्रथम महापुरुष ठरले.

विसाव्या शतकातील महान राजकीय संत म्हणून चिरपरिचित असणारे म. गांधी देखील बाराव्या शतकातील म. बसवेश्वरांचे तत्त्वसिद्धांत व विचारसरणीचे प्रतिपादन करणारे

होते. म. गांधी 'भारताचे युग पुरुष' होते. ते भारताला पारतंत्र्यातून मुक्त करून स्वातंत्र्य प्राप्त करून देणारे स्वातंत्र्यप्रेमी होते. म. गांधी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे नेते होते. अहिंसेचे परम पुजारी, शांतीचे परमदूत, सत्येचे तपस्वी म्हणजेच मोहनदास करमचंद गांधी होत. म. बसवेश्वर व म. गांधी या दोन्ही महापुरुषांच्या जीवनकाळामध्ये सुमारे आठशे पेक्षा अधिक वर्षांचे अंतर असूनसुद्धा दोघांचे तत्त्वसिद्धांत, जीवनपद्धती व विचारसरणीमध्ये साम्यता दिसून येते. दोघेही राजकीय सत्तेचे अनुभव असणारे होते. त्यामुळे राजकारणात नैतिकता असणे आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. एवढेच नव्हे, तर ते त्यांनी स्वतःही आपल्या आचरणात आणलेले आहे.

म. बसवेश्वर व म. गांधी या दोघांच्याही काळातील सामाजिक परिस्थितीमध्ये फारसा काही बदल नव्हता. तीच घुसमट होती. म. गांधींनी ती घुसमट मानसिक आणि दैहिक स्वरूपात स्वतः अनुभव केलेली होती; पण म. बसवेश्वरांना भलेही दैहिक घुसमट अनुभव करण्याचा प्रसंग आला नसेल, तरीही ते त्या सर्व मानसिक भावरोधांनी उद्वेगून गेले होते. उच्च कुलीन पुरोहितशाही कुटुंबात जन्म घेऊनसुद्धा म. बसवेश्वरांनी कधीही आपल्या उच्च कुलीन होण्याचा कुठेही उल्लेख केलेला नाही; परंतु आपला परिचय सांगताना एका वचनात ते स्वतः असे म्हणतात की, "मी ढोर कंकय्या व मातंग चन्नय्या यांच्या घरातील दास आहे." असे लहानपणाच्या व लीनतेच्या भाव-भावना ते व्यक्त करतात. पुढच्या जन्मी नीच कुलात जन्म घेण्याची कामना बाळगणाऱ्या आपल्या समकालीन महात्म्यांपेक्षा याच जन्मात दलितांच्या समवेत नव्हे तर स्वतः दलित आहे, असे म्हणणारे म. बसवेश्वर किती महान होते, ते त्यांच्या या विचारांवरून लक्षात येते.

म. गांधीजींना दक्षिण आफ्रिकेत वर्णभेदामुळे अनेक यातना सोसाव्या लागल्या. या संकटांना त्यांनी न घाबरता धैर्याने तोंड दिले. एवढेच नव्हे, तर त्या विरोधात दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना संघटित करून वर्णभेदाच्या विरोधात अहिंसेच्या मार्गाने संघर्षाला आरंभ करणारे प्रथम महापुरुष म. गांधी होते. या दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाच्या विरोधात त्यांनी

केलेल्या कार्यामुळेच त्यांच्या जीवनाला एक नवीन कलाटणी प्राप्त झाली, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

म. बसवेश्वर व म. गांधी यांना जेव्हा आपण या पार्श्वभूमीतून पाहतो, तेव्हा उभय महापुरुष आपल्या जातीच्या पिंजऱ्यातून बाहेर पडून सच्चा मानवतावादी विचार प्रतिपादन करणारे होते, हे लक्षात येते. त्याचबरोबर ते राजकारणात नैतिकता अत्यावश्यक आहे, असे मत मांडणारे होते. 'मानवांनाच' महान मानणारे होते. म. बसवेश्वर व म.गांधी यांनी समाजातील दोष नष्ट करण्यासाठी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले होते. त्यांनी सामाजिक क्रांतीद्वारे राजकीय परिवर्तन घडवून आणले. म. बसवेश्वर यांनी विनम्रता, विनयता, लीनता हे तत्त्वसिद्धांत त्यांच्या आचरणात आणले होते.

विसाव्या शतकातील म. गांधीजी अहिंसा, सत्य आणि शांती हे तत्त्व सांगून ते स्वतः आचरणात आणले होते. दोघांनीही आर्थिक व्यवहाराला नैतिकतेला जोड दिली. किंबहुना एक नवी आर्थिक क्रांतीच केली आहे, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. म. बसवेश्वर 'कायकवे कैलास' (Work is Worship) म्हणजेच 'कर्म हेच स्वर्ग आहे' असे विचार आचरणात आणले. त्यांच्या दृष्टीत कर्म श्रेष्ठ आहे; पण आपण जे काही कर्म करतो ते नित्य, सत्य व परिपूर्ण असणे आवश्यक आहे, असे त्यांचे म्हणणे होते. म्हणजे कर्म हे स्वतःचा, समाजाचा व राष्ट्राचा विकास करणारे असावे.

म. बसवेश्वर व म. गांधी या दोन्ही विचारवंतांनी आपल्या विचारांनी नैतिकतेला अधिक महत्त्व दिलेले आढळते आणि राजकारणात ते अत्यावश्यक आहे, असे विचार ते मांडतात. नैतिकता हाच राजकारणाचा मूळ पाया आहे, त्याशिवाय राजकारण अपूर्ण आहे, असे विचार मांडून आपल्या जीवनात ते आचरणात आणले. म. गांधी आपल्या आयुष्यात कोणतेही पद, प्रतिष्ठा यांच्या मोहात पडले नाहीत, तर समाजसेवा हीच ईश्वरसेवा आहे, असे मत मांडून आयुष्यभर ते आचरणात आणले. म. बसवेश्वर चालुक्य साम्राज्यातील बिज्जळ राजदरबारात कारकुन पदापासून ते अर्थमंत्री व महामंत्रीपदापर्यंत राजसत्तेच्या कामकाजात असून देखील त्या सत्तेचा, प्रतिष्ठेचा व पदाचा त्यांनी कधीही दुरुपयोग न करता

त्यांनी लोककल्याणासाठी, समाजाच्या हितासाठीच संपूर्ण आयुष्यभर काम केलेले आढळून येते. विशेष म्हणजे राजेशाहीत असून देखील लोकशाही तत्त्वसिद्धांत जनमानसामध्ये रुजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

म. बसवेश्वर एका वचनात असे म्हणतात की, “सामान्यातील सामान्य मी, दासाचा दास मी.” तसेच ‘जनसेवा हीच ईश्वर सेवा’ आहे, असे मानून त्यांनी ते आचरणात आणले. महामंत्रीपदाचे काम करत असताना स्वार्थाला बळी न पडता ते निःस्वार्थपणे लोककल्याणाचे कार्य करत राहिले. हेच विचार विसाव्या शतकातील म. गांधींना अभिप्रेत असलेले आढळते. या दोघांनी द्वेषाला, अन्यायाला व हिंसेला कधीही वाव दिलेला नाही. म्हणून ते शांतीचे व अहिंसेचे पुजारी होते.

म. गांधींनी भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून दिले, ते अहिंसेच्या मार्गाने. ते स्वतः असे म्हणत की, “अहिंसा हा माझा पहिला व शेवटचा धर्म आहे.” त्यांच्या शब्दांत सांगायचे तर ‘धर्म म्हणजे अहिंसा, अहिंसा म्हणजेच धर्म’ असे म्हणणारे बापू भारतातच नव्हेत, तर जगातही प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रातील संत तुकाराम महाराजांची ‘जैसे बोले, तैसे चाले। त्याची वंदावे पावले’ ही उक्ती म. गांधी यांनी आपल्या जीवनात आचरण आणलेली दिसून येते. म्हणून त्यांनी भारतीयांचे हृदय जिंकले. एवढेच नव्हे, तर विश्वाच्या विश्वासाला ते पात्र ठरले. म. गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा सखोल अध्ययन करणारे असे म्हणतात की, “म. गांधी हे संतांमधील राजकारणी आहेत आणि राजकारणामधील संत आहेत.” तसेच आचार्य जावडेकर गांधीजींचे वर्णन ‘राजकीय कर्मयोगी’ असे म्हणतात.

म. बसवेश्वरांनी त्या काळात केलेल्या सामाजिक व राजकीय क्रांतीमुळेच त्यांना ‘अण्णा’ (बसवण्णा) या नावाने तत्कालीन समाजाने संबोधले आहे. म. गांधींनी भारताला पारतंत्र्यातून स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. म्हणून ‘बापू’ या नावाने ते चिरपरिचित झाले. दोन्ही महापुरुष व्यक्ती नसून, समाजपरिवर्तनाची एक शक्ती होते. दोघांचेही बालपण धार्मिक व सुसंस्कृत कौटुंबिक वातावरणात झाले होते. ते दोघेही सत्य, अहिंसा, न्याय आणि बंधुता हीच

खरी मानवीय मूल्ये आहेत व ती राजकारणात असणे अत्यावश्यक आहेत, असे मत मांडून मानवतेलाच महत्त्व देणारे होते.

म. बसवेश्वर एकेश्वरवादी होते. म्हणजेच ईश्वर एकच आहे, त्याची नावे अनेक आहेत, असे आपल्या एका वचनात ते म्हणतात. त्यांची सर्व वचने कन्नड भाषेमध्ये आहे. कन्नड भाषेत ते असे म्हणतात, 'देवन्नोब नामहलऊ' म्हणजे 'ईश्वर एकच आहे'; पण त्याची नावे अनेक आहेत. विसाव्या शतकातील म. गांधी देखील ईश्वर उपासक होते. त्यांनी देखील एकेश्वरवाद मांडला आहे. त्यांची धार्मिकतेबद्दलची संकल्पना अशी आहे की, "धर्म हा मानवाला एकमेकांपासून अलग करण्यासाठी नसून, एकमेकांना जोडणारा आहे." जगातील कोणताही धर्म हिंसा प्रतिपादन करत नसून, अहिंसाच प्रतिपादन करतो. म्हणून म. गांधी 'सर्वधर्म समभाव' या संकल्पनेच्या दृष्टीने बघत होते. अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य हेच धार्मिक व्यक्तीसाठी आवश्यक आहेत. त्यांचे धार्मिक विचार काल्पनिक नसून, वास्तविक होते. ते स्वतः असे म्हणत की, "धर्माचे कोणतेही तत्त्व विवेकाच्या विरोधात जाणारे असेल किंवा नैतिकतेशी संघर्ष करणारे असेल, तर अशा तत्त्वाला व धर्माला मी नकार देईन." हेच विचार बाराव्या शतकात म. बसवेश्वरांनी मांडले होते. या दोन्ही विचारवंतांचे विचार अंधश्रद्धेच्या व तत्कालीन रूढी, प्रथा व परंपरांच्या विरोधात असलेले आढळते.

म. बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात स्वातंत्र्य, समता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी 'अनुभव मंटपा'ची स्थापना करून प्रत्येक व्यक्तीला समान संधी उपलब्ध करून दिली. तिथे जाती, धर्म, लिंग यांचा भेदाभेद नव्हता. या अनुभव मंटपाद्वारे तत्कालीन सामाजिक, राजकीय व आर्थिक समस्यांच्या विरोधात एका नव्या स्वरूपाची क्रांती त्यांनी घडवून आली. अनुभव मंटपामध्ये ते सर्व स्त्री-पुरुषांना, सर्व जातिधर्माला, सर्व भाषिक लोकांना घेऊन वैचारिक चर्चासत्र घडवून आणत असत. येथील चर्चा केवळ चर्चेपुरत्याच मर्यादित नसून ते आचरणात आणण्याचे आटोकाट प्रयत्न त्यांनी केले होते.

हल्ली कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील बसवकल्याण इथे 'अनुभव मंटप' हे स्थान ओळखले जाते. हे अनुभव मंटप केवळ अध्यात्माची चर्चा, विचारविनिमय पुरतेच सीमित

नव्हते, तर येथे त्या काळातील समाजातील ज्वलंत सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्यांवर लोकशाही मार्गाने चर्चा करून योग्य तो मार्गोपाय शोधून ते आचरणात आणले जात असे. त्यामुळेच म. बसवेश्वरांचे अध्ययन व अध्यापन करणारी विद्वान संशोधक मंडळी “अनुभव मंटप ही जगातील प्रथम संसद होय.” (Basweshvar’s Anubhav Mantappa was the First Parliament in the World.) असे मत व्यक्त करतात.

अनुभव मंटपामध्ये अध्यात्माची, वैचारिकतेची चर्चा होत असत. ही चर्चा वचन साहित्याच्या स्वरूपात आजही उपलब्ध आहे. वचन साहित्य निर्माण करणारे अनेक वचनकार होते; त्यात सातशे सत्तर पेक्षाही अधिक वचनकारांची वचने आज उपलब्ध आहेत. या वचनकारांना ‘शरण’ व ‘शरणी’ या नावाने ओळखले जाते. म. बसवेश्वरांच्या नेतृत्वाखाली सामान्य (लोक) भाषेत हे वचनशास्त्र निर्माण केले. म्हणून कन्नड भाषेला एक नाविण्य प्राप्त झाले आहे. त्यामुळेच म. बसवेश्वरांना ‘वचन साहित्याचा निर्माता’ असे म्हटले, तर वावगे ठरणारे नाही.

म. गांधींनी विसाव्या शतकात भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याकरिता सत्य, अहिंसा व न्यायाचा अवलंब केला. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय हे लोकशाहीचे मूळ तत्त्वसिद्धांत भारतात रुजविण्यासाठी म. गांधींनी अहोरात्र प्रयत्न केले.

सद्य स्थितीत सर्व क्षेत्रात राजकारणाचा शिरकाव झालेला आहे; कारण राजकारण हा सत्तेचा केंद्रबिंदू आहे. प्रत्येक व्यक्ती सत्ताधारी बनू पाहत आहे. त्यामुळे भ्रष्टाचार, लाचलुचपत, दहशतवाद अशा अनेक समस्या राष्ट्रालाच नव्हे तर विश्वाला भेडसावत आहेत. या सर्व समस्यांच्या निराकरणासाठी या दोन्ही महापुरुषांचा तत्त्वसिद्धांत व विचार आज आवश्यक वाटतो. म्हणून प्रस्तुत संशोधकाने या दोघांच्याही तुलनात्मक चिंतनावर अध्ययन करून त्याचा उपयोग समाजाला व्हावा, यासाठी या संशोधन विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची समस्या (Problem of Research)

संशोधकाचे संशोधन हे संशोधन समस्येचे उत्तर शोधण्यासाठी असते.

1. बाराव्या शतकातील म. बसवेश्वर आणि विसाव्या शतकातील म. गांधी यांच्या तत्कालीन परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. म. बसवेश्वरकालीन व म. गांधीकालीन समाजरचना व त्याविषयीचे त्यांचे विचार यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. दोन्ही महापुरुषांच्या धार्मिक आंदोलनातील कार्याचा तुलनात्मक अभ्यास करणे.
4. म. बसवेश्वर व म. गांधी यांच्या सामाजिक स्थिती-गतीचा तुलनात्मक अभ्यास करणे आणि दोन्ही विचारवंतांच्या राजकीय विचारांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
5. म. बसवेश्वर व म. गांधी यांच्या धार्मिक चिंतनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research)

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1. म. बसवेश्वर व म. गांधी यांच्या जीवनपरिचयाचा आढावा घेणे.
2. म. बसवेश्वर व म. गांधी यांच्या सामाजिक विचारांचा आढावा घेणे.
3. म. बसवेश्वर व म. गांधी यांच्या राजकीय विचारांचा आढावा घेणे.
4. म. बसवेश्वर व म. गांधी यांच्या धार्मिक व आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

संशोधन विषयाचे महत्त्व (Importance of Topic)

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या अभ्यासाद्वारे बाराव्या शतकातील म. बसवेश्वर व विसाव्या शतकातील म. गांधी यांच्या विचारांतील तुलनात्मक अभ्यासातून/चिंतनातून तत्कालीन परिस्थितीची जाणीव करून देणे तसेच सामाजिक, राजकीय, आर्थिक व धार्मिक क्षेत्रातील विचार व कार्याचे ज्ञान प्राप्त करून घेणे व याद्वारे दोन्ही तत्त्वचिंतकांचे विचार व कार्य आधुनिक राजकारणात येणे आवश्यक वाटत असल्याने या संशोधनाची गरज असल्याचे संशोधकाचे मत आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology)

संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्रोतांचा वापर केलेला आहे. समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. त्यामध्ये ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, तुलनात्मक, अन्वेषणात्मक, वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तसेच संशोधन विषयासंबंधी संदर्भ ग्रंथ, संशोधन पत्रिका, विश्वकोष, नियतकालिके, साप्ताहिके, दैनिके व इंटरनेट इत्यादी द्वितीय स्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन (Data Collection)

प्रस्तुत संशोधनाच्या तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात येईल. म. बसवेश्वर यांचे वचन साहित्य, कर्नाटक सरकारने वेळोवेळी प्रसिद्ध केलेले ग्रंथ व इतर लेखकांचे संदर्भ ग्रंथ, बाराव्या शतकामधील इतर वचनकारांची वचने यांचा वापर करण्यात येईल. म. गांधी यांचे आत्मचरित्र, वृत्तपत्रे, स्वातंत्र्य आंदोलनातील ऐतिहासिक माहिती असलेले ग्रंथ. तसेच या दोघांविषयी लिहिलेले साहित्य, अनुवादित ग्रंथ इत्यादी दुय्यम साधनांचा वापर करण्यात येईल.

पूर्वसंशोधनाचा आढावा (Review of Literature)

दिलीप हरिचंद यांनी 'म. गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामधील राजकारणाचे चिंतन' यावर त्यांनी अभ्यास केलेला आहे. राजशेखर सोलापुरे यांनी 'म. बसवेश्वरांचा राजकीय विचार आणि कार्याची प्रासंगिकता : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधन केले. रत्नाकर बाबुराव लक्षटे यांनी 'म. बसवेश्वरांच्या तत्कालीन सामाजिक व राजकीय व्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास' यावर अध्ययन केले आहे.

प्रस्तुत संशोधकाने निवडलेल्या विषयावरील संशोनापेक्षा हे संशोधन वेगळे आहे. म. बसवेश्वर व म. गांधी यांच्या राजकीय व सामाजिक चिंतनाचे तुलनात्मक अध्ययन होण्याची आवश्यकता असल्याने संशोधकाने हा विषय निवडला आहे. या संशोधनाचा उपयोग

समाजाला व राज्यशास्त्राच्या ज्ञानशाखेत मौलिक भर टाकण्यासाठी होणार आहे. म्हणून हे संशोधन हाती घेतले आहे.

संशोधनाची गृहितके (Hypotheses of Research)

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितकांची मांडणी करण्यात आलेली आहेत.

1. बाराव्या शतकातील म. बसवेश्वर व विसाव्या शतकातील म. गांधी या दोन्ही राजकीय संतांच्या जीवन कालावधीमध्ये सुमारे आठशे वर्षांचे अंतर आहे; परंतु दोघांच्याही विचारांचे अवलोकन केले असता त्यामध्ये साम्य दिसून येते.
2. भारतीय समाजव्यवस्थेत कलंक मानली जाणारी अस्पृश्यता दूर करण्यासाठी दोन्ही महापुरुषांनी आपापल्या कालखंडात प्रयत्न केले आहेत.
3. म. बसवेश्वर व म. गांधी यांचे विचार धार्मिकतेपेक्षाही नैतिक मूल्यांवर व सामाजिक लोकशाहीवर अधिक भर देणारे होते.
4. म. बसवेश्वर व म. गांधी यांनी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक सुधारणांवर भर दिलेला आहे.
5. सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आर्थिक परिवर्तन होण्याची गरज असते. म्हणून तत्कालीन समस्या सोडविण्यासाठी म. बसवेश्वर व म. गांधी यांनी आर्थिक विचार मांडले आहेत.
6. सद्यकालीन राजकीय व सामाजिक प्रश्नांच्या निराकरणासाठी म. बसवेश्वर व म. गांधींचे विचार साहाय्यकारी आहेत.

प्रकरणांची रूपरेषा (Chapter Planning)

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या मांडणीसाठी खालीलप्रमाणे प्रकरणरचना योजिली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

या प्रकरणात विषयप्रवेश, संशोधन समस्या, गृहितके, संशोधनाची उद्दिष्टे व महत्त्व, संशोधन पद्धती, तथ्य संकलन व प्रकरण नियोजन इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : म. बसवेश्वर व म. गांधी यांचे जीवनचरित्र

प्रस्तुत प्रकरणामध्ये म. बसवेश्वर व म. गांधी यांचे जन्म, बालपण, त्यांच्यावर झालेले संस्कार, शिक्षण इत्यादी विषयी विस्तृत मांडणी करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : म. बसवेश्वर व म. गांधी यांचे सामाजिक विचार

प्रस्तुत प्रकरणामध्ये समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा, जातीयता, अस्पृश्यता इत्यादी सामाजिक समस्या दूर करण्यासाठी म. बसवेश्वर व म. गांधी यांनी केलेल्या प्रयत्नांची व कार्याची तुलनात्मक चर्चा करण्यात येईल.

प्रकरण चौथे : म. बसवेश्वर व म. गांधी यांचे धार्मिक विचार

प्रस्तुत प्रकरणामध्ये धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या कर्मकांडाला, अंधश्रद्धांना विरोध करून विशुद्ध नैतिक व लोकशाही धर्म सांगणाऱ्या म. बसवेश्वर व म. गांधी यांचे विचार जाणून घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे : म. बसवेश्वर व म. गांधी यांचे राजकीय विचार

प्रस्तुत प्रकरणामध्ये म. बसवेश्वर व म. गांधी यांच्या राजकीय विचारांचा आढावा घेत त्यांच्या राजकीय कार्याची माहिती देऊन त्या दोन्ही विचारवंतांच्या विचारांचे तुलनात्मक अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण सहावे : म. बसवेश्वर व म. गांधी यांचे आर्थिक विचार

प्रस्तुत प्रकरणामध्ये म. बसवेश्वर व म. गांधी यांचे आर्थिक विचार स्पष्ट करून दोघांची तुलनात्मक चर्चा करण्यात येईल.

प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि शिफारशी

शोध प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये प्रस्तुत अभ्यासातून/चिंतनातून निष्पन्न झालेले निष्कर्ष काढून शिफारशी सुचविण्यात येतील.

सदरील सशोधन कार्याचा अभ्यास वरीलप्रमाणे सात प्रकरणांमध्ये करण्यात येणार असून, त्याचे तपशीलवार विवेचन करण्यात येणार आहे. शेवटी संदर्भ सूची व परिशिष्ट जोडण्यात येणार आहे.

संदर्भग्रंथ सूची

1. अजमेरा सूर्यकांत, सौ. अनुराधा पोतदार, महात्मा गांधीजींची विचारधारा, ‘युवराज माळी’, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.
2. गांधी मोहनदास करमचंद, सत्याचे प्रयोग/आत्मकथा, जितेन्द्र ठाकोरभाई देसाई, नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद.
3. गुह रामचंद (अनुवाद) शारदा साठे, गांधीनंतरचा भारत, मॅजेस्टिक पब्लिशींग हाऊस, ठाणे.
4. जोशी गजानन नारायण, आधुनिक भारतीय तत्त्वज्ञान, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे.
5. ताटके अरविंद, महात्मा गांधी, ‘वरद’, सेनापती बापट मार्ग, पुणे.
6. तिपेरूद्र स्वामी एच., बसवेश्वर, साहित्य अकॅडमी, नई दिल्ली, 1982.
7. देसाई नारायणभाई (अनुवादित) सुरेशचंद्र वारघडे, अचंबित करणाऱ्या बापूकथा, समकालीन प्रकाशन, पुणे.
8. देशपांडे मुक्ता शिरीष, मोहनदास (अनुवादित), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
9. पट्टदेवरू शिवलिंग (प.पू.श्री.श्री.), बसव तत्त्वांचे आचरण आणि आपण, हिरेमठ संस्थान, भालकी, जि. बिदर.
10. पाटील वा.भा., संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, सुधारित आवृत्ती, 2010.
11. पांढरीपांडे सु.श्री., म. गांधींचे ‘हिन्दस्वराज्य’ आणि नवे मन्वंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
12. पुजारी बी.बी., बसवण्णा आणि कायक तत्त्व, बसव सेंटर प्रकाशन, सोलापूर, 1993.
13. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, 1987.
14. भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.
15. मेगलेवार सुधाकर, वीरशैव धर्मपंथ, नटराज प्रकाशन, नागपूर.

16. शिवरूद्रप्पा ए.एल., शरण धर्मातील वैश्विक मूल्ये.
17. An Gadi S.M., 'Baswa Darshan', Sarojini Angadi Kalyan Nagar, Dharwad, 1986.
18. Bendopadhayay A.J., Social & Political Thoughts of M. Gandhi, Allied Publishers, New Delhi, 1969.
19. Bhanorkar R.G., Vaishnavism Saivism and Minor Religious System, Strasburg, 1913.
20. Chidananad, Basawanna, National Book Trust, New Delhi, 1972.
21. Davis K., Human Society, New York, Macmillan, 1948.
22. Desai, P.B., Basaveshwara & His Times, Karnataka University, Dharwad, 1968.
23. Hunshal, S.M. The Lingayat Movement, Karnataka Sahitya Mandal, Dharwad, 1947.
24. Kambi, V.S., Philosophy of Kayaka, Basava Samiti, Bangalore, 1992.
25. Leshine Lipson, The Democratic Civilisation, Vakils Feeffer & Simons, Bombay, 1975.
26. Sunderjaj & Others, Thus Speak Basawa, Basawa Samiti, Bangalore.

संशोधन मार्गदर्शक

डॉ. अजय वसंतराव गव्हाणे
एम.ए., एम.फिल., पीएच.डी.
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
यशवंत महाविद्यालय, नांदेड

संशोधक विद्यार्थी

प्रा. शंकरय्या करबसय्या कळ्ळीमठ
एम.ए., एम.फिल.
साहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगर,
कोटग्याळ, ता. मुखेड, जि. नांदेड